# प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/५०४६ /२०२४ पुणे दिनांक - १९/०७/२०२४

विश्रामबाग वाहतूक विभागांतर्गत राष्ट्रीय स्वंयसेवक संघ कार्यालय, मोदीबाग शनिवार पेठ पुणे हे महत्वाचे संवेदनशील ठिकाण आहे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघ कार्यालयात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व भारतीय जनता पार्टिचे कार्यक्रम / मिटिंग होत असतात. मा. सर संघचालक त्याठिकाणी मुक्कामास येत असतात. सदर ठिकाणाच्या बाजुस असणारे व्यापारी दुकानदार यांचेकडे येणारे ग्राहक हे सदर इमारतीचे आजुबाजुस आपली वाहने पार्क करत असतात.त्यामुळे होणा-या वाहतूक कोंडी टाळणे तसेच वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार. पोलीस उपआयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, विश्रामबाग वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर दि. **१९/०७/२०२४ पासुन** तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## विश्रांमबाग वाहतुक विभाग पुणे अंतर्गत

- **नामदेव राऊत पथावरील सिध्दीविनायक अभ्यासिका ते अहिल्यादेवी चौक(अंतर ५० मिटर) रस्त्याचे दोन्ही बाजुस नो पार्किंग करण्यात येत आहे.**
- **दिवाकर पथावरील बालाजी भेळ व पाणीपुरी ते माधव बिल्डिंग (अंतर ४० मिटर) रस्त्याचे दोन्ही बाजुस नो पार्किंग करण्यात येत आहे.**

**(रोहिदास पवार)**
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,
पुणे शहर

प्रत :- सर्व संबधीतांना